.nagpur

# NMC e NEWS LETTER

ऑगस्ट २०१८

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

# प्रथम 'हाऊसिंग बँक' नंतर नियोजनबद्ध विकास

## स्मार्ट सिटीसाठी ना. नितीन गडकरींची सूचना : विविध प्रकल्पाच्या पाठपुराव्यासाठी आढावा बैठक



पूर्व नागपुरात स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत पारडी-भरतवाडा-पुनापूर मध्ये होत असलेल्या नियोजनबद्ध विकासाचे दोन टप्पे ठरवा. पहिल्या टप्प्यत नागपूर सुधार प्रन्यासची जागा, खासगी जागा व अन्य जागांवर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरांचे बांधकाम पूर्ण करा. उत्तम दर्जाची घरे बांधून तयार करा. या घरांमध्ये नागरिकांना जागा दिल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात त्या भागाचा नियोजनबद्ध विकास करा, अशी सूचना केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केली. नागपूर शहरात सुरू असलेल्या विविध प्रकल्पांचा आणि विकास कामांचा आढावा घेण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या डॉ. पंजाबराव स्मृती सभागृहात रविवारी (ता. १२) बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत ते बोलत होते. बैठकीला महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, आमदार कृष्णा खोपडे, आमदार गिरीश व्यास, आमदार विकास कुंभारे, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, माजी महापौर व मनपाच्या विशेष प्रकल्प समितीचे अध्यक्ष प्रवीण दटके, सडक परिवहन मंत्री कार्यालयाचे विशेष कार्य अधिकारी सुधीर देऊळगांवकर, विभागीय आयुक्त अनुपकुमार, मनपा आयुक्त वीरेंद्र सिंह, जिल्हाधिकारी तथा नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती अश्विन मुदगल व प्रकल्पाशी संबंधित अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. स्मार्ट सिटी प्रकल्पाचा आढावा घेताना ना. नितीन गडकरी म्हणाले, पूर्व नागपुरात स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत होत असलेल्या नियोजनबद्ध विकासाअंतर्गत कुणीही बेघर होणार नाही किंवा कुणाचेही नुकसान होणार नाही याची काळजी घ्या. नियोजन आराखड्यानुसार जे बाधित होणार आहे त्यांना सर्वप्रथम राहण्यासाठी घरे उपलब्ध करून द्या. ही घरे उच्च प्रतीची असायला हवी. या घरांमध्ये सोलरवर वीज, वॉटर हिटर आणि एलईडी दिवे लावा. तांत्रिक आणि आर्थिक अर्हतेवर याबाबत निविदा मागवा, अशाही सूचना त्यांनी यावेळी केल्या. हा संपूर्ण प्रकल्प दोन टप्प्यात करण्याचेही त्यांनी सांगितले. पहिल्या टप्प्यात घरांची बांधणी आणि दुसऱ्या टप्प्यात नियोजनानुसार विकास असे कार्य करण्यास ना. गडकरी यांनी सांगितले. घरांचे बांधकाम करण्यासाठी प्रथम 'प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंसी' नेमा. सुरक्षा भिंत, अंतर्गत रस्ते बांधण्यासाठी फ्लाय शचा वापर करा. सार्वजनिक कार्यक्रमासाठी समाजमंदिर तयार करा. वॉटर रिसायकल प्लान्ट तयार करा. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारून त्यातील पाणी शौचालय आणि उद्यानांकरिता द्या. या भागात उत्तम बाजार तयार करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. संचालन सहायक आयुक्त महेश मोरोणे यांनी केले. आभार जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यांनी मानले.

## थोडक्यात

### कर थकबाकीमुक्त शहराचे उदिष्ट्य ठेवून काम करा : संदीप जाधव

कर आकारणी व कर संकलन समितीच्या झोननिहाय बैठकीत निर्देश

नागपूर शहरातील नागरिकांकडे मालमत्ता कराची थकबाकी अनेक वर्षांपासून आहे. त्यामुळे मनपाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. शहरातील विविध विकास कामांना गती मिळावी, यासाठी संपूर्ण थकबाकी वसूल करण्याच्या उद्देशाने काम करा, असे निर्देश मनपाच्या कर आकारणी व कर संकलन विशेष समितीचे सभापती संदीप जाधव यांनी कर निरिक्षक व कर संकलक यांना दिले.समितीच्या वतीने कर आकारणी संदर्भातील आढावा घेण्यासाठी झोननिहाय बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी (ता. २१) हनुमाननगर, नेहरूनगर आणि गांधीबाग झोनमध्ये बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कर विभागात मागील अनेक वर्षांपासून काम करूनही योग्य निकाल न देणाऱ्या निष्क्रीय कर निरीक्षक व कर संकलक यांच्यावर कारवाई करण्याचा इशाराही सभापती श्री. जाधव यांनी यावेळी दिला. कर निरीक्षक व कर संकलक यांचे निष्क्रीय वर्तन व बेजाबदारपणा यामुळेही दिवसेंदिवस थकबाकीचा आकडा वाढत आहे. त्यामुळेच महापालिकेकडून देण्यात आलेले त्रैमासिक उद्दिष्ट निम्मेही गाठता आले नाही. कर निरिक्षक व कर संकलक यांना येत असलेल्या अडचणी सोडविण्यास मनपा तत्पर आहे. त्यामुळे कर निरिक्षक व संकलकांनीही आपल्या कामाप्रति तत्परता दाखवावी, असेही ते म्हणाले.




### विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर वाढविण्यासाठी शिक्षण परिषद उपयोगी ठरेल : रवींद्र ठाकरे

महानगरपालिकेच्या पहिल्या शिक्षण परिषदेचे उद्घाटन

विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर वाढविण्यासाठी तसेचशिक्षकांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षण परिषद उपयोगी ठरेल असा विश्वास नागपूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे यांनी व्यक्त केला. शुक्रवारी (ता.२४) महाराष्ट्र राज्य प्रगत शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत कविवर्य सुरेश भट सभागृह येथे महानगरपालिकेतील शिक्षकांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना श्री.ठाकरे म्हणाले, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी महानगरपालिकेचा शिक्षण विभाग सतत झटत असतो. आपल्या शाळेतील विद्यार्थी शंभर टक्के प्रगत होण्यासाठी शिक्षकांनी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे. शाळेतील प्रगत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांची आवड निवड लक्षात घेऊन त्याप्रमाणे त्यांच्या आवडीनिहाय क्षेत्रात त्यांना प्रवीण करणे गरजेचे आहे. आता अभ्यासक्रम बदललेला आहे. त्यानुसार शिक्षकांनीही आपला अध्ययन स्तर उंचावणे हे देखील महत्त्वाचे आहे. शिक्षकांचा अध्ययन स्तर सुधारण्यासाठी अशा प्रकारच्या सात कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### नंदा जिचकार महापौर परिषदेच्या उपाध्यक्षपदी

पनवेलच्या परिषदेत अविरोध निवड



नागपूरच्या महापौर नंदा जिचकार यांची महाराष्ट्र महापौर परिषद या संस्थेच्या उपाध्यक्षपदी निवड झाली. पनवेल येथे तेथील महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या पुढाकाराने रामशेठ ठाकूर इंटरनेशनल स्पोर्ट्स काम्प्लेक्स येथे आज (ता. २५) महापौर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात पुढील कार्यकाळासाठी महापौर नंदा जिचकार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.महाराष्ट्र महापौर परिषदेच्या वतीने दर तीन महिन्यानी परिषदेचे आयोजन करण्यात येते. त्यात महापौरांच्या समस्यांवर व विविध मुद्दयांवर चर्चा करण्यात येते. महापौर परिषदेचे अध्यक्ष विश्वनाथ महाडेश्वर हे आहेत.त्यांनी नागपूरच्या महापौर नंदा जिचकार यांची एकमताने महापौर परिषदेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याचे जाहीर केले. पनवेलमध्ये आयोजित दोन दिवसीय परिषदेत बृहनमुंबई। महानगर पालिका, नागपूर, अमरावती, अकोला, चंद्रपूर, नवी मुंबई, वसई, विरार, पिम्परी-चिंचवड, मीरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, पनवेल याठिकाणचे महापौर आणि पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल मनपाचे आयुक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे अध्यक्ष तथा महापौर परिषदेचे कार्याध्यक्ष रणजीत चौहान, परिषदेचे संयोजक लक्ष्मण लटके सहभागी झाले होते.

# सफाई कामगारांच्या समस्यांसाठी समन्वय समिती गठीत करा

## राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य दिलीप हाथीबेड यांचे निर्देश

शहरातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे, यासाठी सफाई कर्मचारी दिवस-रात्र मेहनत घेतात. या कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यांच्या समस्या वेळेवेळी सोडविण्यात याव्या, यासाठी महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेत समन्वय समिती गठीत करण्याचे निर्देश भारत सरकारच्या राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य दिलीप हाथीबेड यांनी दिले.नागपूर महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांसंबंधी शुक्रवारी (ता. ३१) महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज नवीन प्रशासकीय इमारतीतील आयुक्त कार्यालय सभागृहात राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य दिलीप हाथीबेड यांच्या अध्यक्षतेत बैठक आयोजित करण्यात आली होती. राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य दिलीप हाथीबेड पुढे म्हणाले, सफाई कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणी नेमक्या कुणाकडे मांडाव्या याची माहिती नसते. त्यामुळे ते संबंधित संघटनांच्या प्रतिनिधींना भेटतात. प्रतिनिधी त्या समस्या प्रशासनाकडे मांडतात. समन्वय समितीमध्ये विविध सफाई कामगार संघटनांचे ११ प्रतिनिधी असल्याने त्या अडचणी आयुक्तांच्या निर्देशाने त्वरित सोडविल्या जातील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. आयुक्तांच्या अध्यक्षतेत गठीत समन्वय समितीमध्ये संघटनांचे ९ पुरूष प्रतिनिधी व २ महिला प्रतिनिधींचा समावेश असणार आहे.

### सफाई कर्मचाऱ्यांनाही 'जीपीएस वॉच'

आज महानगरपालिकेकडे सुमारे आठ हजार सफाई कामगार आहेत. मात्र काही कामगारांच्या कामचुकारपणामुळे सर्वच कामगारांवर ताशेरे ओढले जातात. त्यामुळे सर्व सफाई कामगारांवर लक्ष ठेवण्यासाठी त्यांना 'जीपीएस' घड्याळ देण्यात आले आहे. यामुळे कर्मचाऱ्याने कोणत्या ठिकाणी किती वेळ काम केले याची माहिती होणार आहे. यापूर्वी महानगपालिकेतील अधिकाऱ्यांनाही या 'जीपीएस वॉच' देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, 'जीपीएस' घड्याळावरील हजेरीच्या आधारेच अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन निघणार असल्याचे यावेळी आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी सांगितले.



# स्मार्ट नागरी सुविधांचा लाभ घ्या!

## महापौर नंदा जिचकार यांचे आवाहन, स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण

नागपूर शहर स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. स्मार्ट शहरातील प्रत्येक नागरी सुविधा स्मार्ट करण्यावर भर आहे. त्यादृष्टीने कार्य सुरू आहे. नागपूर शहरातील सार्वजनिक वाहतूकही स्मार्ट होत आहे. मेट्रो येत आहे. इथेनॉलवर चालणाऱ्या ग्रीन बस, इलेक्ट्रीक टॅक्सी, ई-रिक्षा अशा अनेक पर्यावरणपूरक वाहतुकीच्या सोयी संपूर्ण देशात फक्त नागपुरात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. परंतु जोपर्यंत नागरिक या सुविधांचा लाभ घेणार नाही, तोपर्यंत याचा काही उपयोग नाही. नागरिकांनी या सर्व सुविधांचा लाभ घ्यावा आणि महानगरपालिका अधिकाधिक लोकाभिमुख होण्यास मदत करावी, असे आवाहन महापौर नंदा जिचकार यांनी केले.भारतीय स्वातंत्र्याच्या ७१ व्या वर्धापन दिनानिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या सिव्हील लाईन मुख्यालयात आयोजित ध्वजारोहण सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी मंचावर उपमहापौर दीपराज पार्डीकर, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, आयुक्त वीरेंद्र सिंह, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, एनईएसएलचे संचालक डॉ. आर. झेड सिद्दिकी उपस्थित होते. पुढे बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, नागपूर शहर 'विकासाचे मॉडेल' म्हणून उदयास येत आहे. येथील प्रत्येक सोयी सुविधा स्मार्ट करण्याचा आमचा प्रयत्न आहे. विकास,सौंदर्यीकरण, पर्यावरणपूरक उत्सव अशा विविध पैलूंअंतर्गत कार्य सुरू आहे. विविध योजनांचा लाभ येथील त्या-त्या घटकातील नागरिकांना मिळावा, यासाठी यंत्रणा दिवसरात्र कार्यरत आहे. या सर्व कार्यात नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. नागरिकांनी प्रत्येक योजनांत, उपक्रमांत सहभाग द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तत्पूर्वी महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. अग्निशमन पथकाचे महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे व आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी निरीक्षण केले. त्यानंतर परेडची मानवंदना स्वीकारली. कार्यक्रमाचे संचालन सहायक आयुक्त महेश मोरोणे यांनी केले. आभार जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यांनी मानले.

### प्रभाग १५ ला ५० लाखांचा पुरस्कार

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाच्या वतीने नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्डाची स्वच्छ वॉर्ड स्पर्धा घेण्यात आली होती. यात धरमपेठ झोनमधील प्रभाग क्र. १५ ला ५० लाख रुपयांचा प्रथम पुरस्कार जाहीर करण्यात आला. द्वितीय क्रमांक धंतोली झोनअंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. १७ ला जाहीर झाला असून तो ३५ लाख रुपयांचा आहे. १५ लाख रुपयांचा तृतीय क्रमांक धंतोली झोनमधीलच प्रभाग क्र. ३३ व प्रभाग क्र. ३५ ला विभागून जाहीर करण्यात आला.

### फिरत्या रुग्णवाहिकेचे लोकार्पण

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत महापौर नंदा जिचकार आणि आयुक्त वीरेंद्र सिंह यांच्या हस्ते फिरत्या रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी उपमहापौर दीपराज पार्डीकर, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, निगम सचिव हरिश दुबे, आरोग्य अधिकारी (मे.) डॉ. अनिल चिव्हाणे, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय जोशी उपस्थित होते.

# अग्निशमन नियमांचे पालन न करणाऱ्या इमारतींवर कारवाई करा!

## आयुक्त वीरेंद्र सिंह यांचे निर्देश : मनपा समन्वय समिती बैठक

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना कायद्याचे पालन न करणाऱ्या इमारतींवर कारवाई करून अशा इमारतींमधील पाणीपुरवठा व विद्युत पुरवठा खंडित करा, असे निर्देश मनपा आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी दिले. गुरूवारी (ता.१६) मनपा आयुक्त कार्यालयात सर्व विभागांची समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती. अग्निशमन व आणीबाणी विभागातर्फे शहरातील ७८२ इमारतधारक व भोगवटदारांना इमारतीमधून दूर निघून जाण्यास नोटीस बजाविण्यात आली होती. मात्र त्यापैकी ३७२ इमारतींनी अद्यापही काही उपाययोजना न केल्याने अशा इमारतीमधील पाणी व वीज पुरवठा खंडित करण्यात यावा, असे निर्देश आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी जलप्रदाय विभाग, ओसीडब्ल्यू व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ, एसएनडीएल च्या अधिकाऱ्यांना दिले.

### रस्त्यांवरील खोदकाम शनिवारपर्यंत निकाली काढा

महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यावर खोदकाम करताना महानगरपालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे. मनपाच्या परवानगीशिवाय रस्त्यांचे खोदकाम करणाऱ्या विभागांवर कायदेशीर कारवाई करण्याचेही यावेळी आयुक्त श्री. सिंह यांनी निर्देशित केले. रस्ते खोदकामासंदर्भात नागपूर सुधार प्रन्यासची सुद्धा परवानगी घेऊन त्या संबंधी रितसर पत्र सादर करण्यात यावे. याशिवाय रस्ते खोदकामासंर्भातील संपूर्ण प्रकरण येत्या शनिवारपर्यंत निकाली काढण्याचेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

# स्थायी समिती, आरोग्य समिती सदस्यांनी जाणून घेतली इंदोरच्या स्वच्छतेबाबत माहिती

## इंदोरच्या दौऱ्यात नागपूर-इंदोर प्रकल्पांसंदर्भात विचारांची देवाणघेवाण

स्वच्छ सर्वेक्षणातून देशात क्रमांक एकवर असलेल्या इंदोर शहरातील महानगरपालिकेच्या नावीन्यपूर्ण प्रकल्पांची माहिती घेण्यासाठी नागपूर महानगरपालिका स्थायी समितीचे सभापती वीरेंद्र कुकरेजा यांच्या नेतृत्वात स्थायी समिती, आरोग्य समितीचे सदस्य आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी अभ्यास दौरा केला. इंदोर मनपाच्या पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांसोबतच्या बैठकीत तेथील इंदोर आणि नागपूरमध्ये राबविण्यात आलेल्या प्रकल्पांच्या माहितीची देवाणघेवाण करण्यात आली.विशेष म्हणजे स्वछतेच्या बाबतीत इंदोर आज क्रमांक एक वर असले तरी नागपूर मध्ये अधिकारी आणि सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या 'स्मार्ट घड्याळी'ची आणि अन्य काही उपक्रमांची प्रशंसा इंदोरमधील पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांनी केली. घड्याळीचे मॉड्यूल इंदोरमध्ये राबविण्याचा मानस त्यांनी नागपूरच्या प्रतिनिधी मंडळासमोर व्यक्त केला.

### काय बघितले इंदोरमध्ये?

सदर अभ्यास दौऱ्यात नागपूर महानगरपालिकेच्या प्रतिनिधी मंडळाने तेथील स्वच्छतेबाबत माहिती घेतली. इंदोर शहरातील नागरिक स्वच्छतेबाबत कमालीचे जागरुक आहेत. इंदोर शहरात प्रत्येक घरातील कचरा विलग होऊनच बाहेर पडतो. इंदोर शहरातील संपूर्ण कचऱ्याचे संकलन आणि वाहतूक इंदोर महानगरपालिकेद्वारेच करण्यात येते. इंदोर महानगरपालिकेअंतर्गत १९ झोन असून ८५ वॉर्ड आहेत. सुमारे ६०० कचरा गाड्या कचरा संकलन करतात. ८५ वार्ड मध्ये प्रत्येकी एक मोठे वाहन देण्यात आले आहे. शहरात कचरा संकलनासाठी १० ट्रान्सपोर्ट स्टेशन आहे. घराघरांतून संकलित केलेला कचरा या ट्रान्सपोर्ट स्टेशनवर छोट्या कचरागाड्यांद्वारे आणण्यात येतो. तेथून तो डम्पिंग यार्डला पाठविला जातो. डम्पिंग यार्डमध्ये संपूर्ण कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते.

### पदाधिकारी-अधिकाऱ्यांसोबत विचारांची देवाणघेवाण

सदर अभ्यास दौऱ्यात नागपूर महानगरपालिकेच्या प्रतिनिधी मंडळाने इंदोर महानगरपालिकेचे पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. या चर्चेत विचारांची देवाणघेवाण झाली. इंदोर शहरात स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून सुरू असलेल्या सर्व नावीन्यपूर्ण प्रकल्पांची माहिती नागपूर येथील प्रतिनिधीमंडळाला देण्यात आली. स्मार्ट सिटी प्रकल्प आणि स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत प्राप्त झालेल्या निधितूनही मोठ्या प्रमाणात स्वछतेवर काम झाल्याचे सांगण्यात आले. नागपुरात सुरू असलेल्या प्रकल्पांची माहिती इंदोरच्या पदाधिकारी-अधिकाऱ्यांना देण्यात आली. प्रतिनिधी मंडळाने या दौऱ्यात नागरिकांशीही संवाद साधला.

# थोडक्यात...

## ‘आयसोलेशन’ च्या जागी अद्ययावत रुग्णालय उभारा!

### आरोग्य सभापती मनोज चापले : प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

नागपूर महानगरपालिकेच्या आयसोलेशन हॉस्पीटलची इमारत जीर्ण झाली आहे. वारंवार येथे दुरूस्ती केली जाते. मात्र पायापासूनच इमारत धोक्यात आली असल्याने ही इमारत पाडून केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत येथे नवीन अद्ययावत इमारत उभारण्यासाठी प्रस्ताव सादर करा, असे निर्देश मनपाचे वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती मनोज चापले यांनी दिले. मंगळवारी (ता.७) मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती उपसभापती विजय चुटेले, सदस्य लखन येरवार, विशाखा बांते, वंदना चांदेकर, उपायुक्त जयंत दांडेगावकर, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, डॉ. अनिल चिव्हाणे, हत्तीरोग अधिकारी जयश्री थोटे, पशुचिकित्सा अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय जोशी, कारखाना विभागाचे योगेश लुंगे, कनक रिसोर्सचे कमलेश शर्मा यांच्यासह दहाही झोनचे झोनल अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी सभापती मनोज चापले म्हणाले, मनपाच्या आयसोलेशन हॉस्पीटलची इमारत शहरातील सर्वात जुन्या इमारतींपैकी आहे. मात्र, सध्या या इमारतीची अवस्था गंभीर आहे. हॉस्पीटल इमारतीच्या दुरुस्तीसाठी कंत्राट काढले जाते. मात्र, त्यातूनही इमारतीची अवस्था पूर्णत: सुधारली जात नाही. शहरातील वाढती लोकसंख्या व रुग्णालयाची गरज लक्षात घेता येथे अद्ययावत सुविधांनी परिपूर्ण नवे रुग्णालय व्हावे. त्यासाठी प्रस्ताव तयार करून सादर करा, असे निर्देश त्यांनी दिले. याशिवाय शहरात ५० नवीन रुग्णालये उभारता येतील एवढा निधी मनपाकडे आहे. मात्र, जागेअभावी ते उभारणे शक्य होत नाही. यासाठी शहरातील मनपाच्या अतिरिक्त जागेचा शोध घेऊन त्यासंबंधी माहिती सादर करावी, असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## महानगरपालिका राबविणार रूबेला लसीकरण मोहीम



नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाद्वारे गोवर रूबेला लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या जनजागृतीसाठी व त्याची माहिती मनपाच्या सर्व वैद्यकीय अधिकारी व नोडल अधिकारी यांच्यामार्फत नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी शुक्रवारी (ता.२४) राजे रघुजी भोसले नगर भवन महाल येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी व्यासपीठावर नागपूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, उपायुक्त राजेश मोहिते, आरोग्य अधिकारी (दवाखाना) डॉ. अनिल चिव्हाणे, एसएमओ डॉ.एम.साजिद, डॉ.एन.के.राठी, नोडल अधिकारी डॉ.नरेंद्र बहिरवार प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी बोलताना अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे म्हणाले, दरवर्षी भारतात गोवर रूबेला या रोगामुळे सुमारे ४९ हजार रूग्णांचा मृत्यू होतो. नागपुरात मागील वर्षी चार ठिकाणी या रोगाचा प्रादुर्भाव झाला होता. हा रोग देशातून हद्दपार करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने मोहीम राबविल्या आहेत. २०२० पर्यंत हा रोग देशातून हद्दपार करण्यासाठी आरोग्य विभागाच्या विविध उपाययोजना सुरू आहेत. महाराष्ट्र शासानाचा आरोग्य विभाग आणि महिला व बालकल्याण विभाग यासाठी विविध मोहीम हाती घेत असल्याची माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रारंभी कार्यशाळेचा उद्देश आरोग्य अधिकारी डॉ.अनिल चिव्हाणे यांनी प्रास्ताविकातून सांगितला. कार्यशाळेमध्ये रूबेला लसीकरणाबाबत तज्ज्ञ मंडळींनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय जोशी, नोडल अधिकारी डॉ.सुनील धुरडे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## वंदे मातरम् स्पर्धेमुळे शहराला वेगळी ओळख : महापौर नंदा जिचकार

### मॉर्डर्न पब्लिक, द रॉयल गोंडवाना, द ब्लाईंड बॉईज इन्स्टिट्युट गटनिहाय विजेते – महापौर चषक वंदे मातरम् समूहगान स्पर्धा



‘महापौर चषक वंदे मारतम् समूहगान स्पर्धे’मुळे शहराचे स्थान उंचावत आहे. मागील २२ वर्षांपासून नियमित सुरू असलेल्या या स्पर्धेच्या माध्यमातून शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या मनात देशाभिमान निर्माण होतो. दिवसेंदिवस स्पर्धेची गुणवत्ता वाढत असून स्पर्धेमुळे शहराला वेगळी ओळख मिळाली आहे, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.त्या नागपूर महानपालिकेच्या वतीने रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित महापौर चषक वंदे मातरम् समूहगान स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात बोलत होत्या. महापौर चषक वंदे मातरम समूहगान स्पर्धेच्या अंतिम फेरीत इयत्ता ९ ते १० वी या गटात मॉडर्न पब्लिक स्कूल कोराडी रोड, ६ ते ८ वी गटात द रॉयल गोंडवाना पब्लिक स्कूल शंकरपूर व पहिली ते पाचवी गटात द ब्लाईंड बॉईज इन्स्टिट्युटने बाजी मारीत प्रथम क्रमांक पटकाविला. बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण समिती सभापती दिलीप दिवे, क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, जलप्रदाय समिती सभापती पिंटू झलके, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, शिक्षण समिती उपसभापती भारती बुंदे, हनुमाननगर झोन सभापती रुपाली ठाकूर, नगरसेविका स्वाती आखतकर, नगरसेवक राजेंद्र सोनकुसरे, भगवान मेंढे, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, देवेन दस्तुरे यांच्यासह अंतिम फेरीचे परीक्षक शहरातील सुप्रसिद्ध गायक एम.ए. कादर, सुप्रसिद्ध गायिका आकांक्षा नगरकर, आशितोष पळसकर उपस्थित होते. यावेळी बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, मागील २२ वर्षापासून मनपाने सुरू केलेल्या या उपक्रमाला मनपाच्या शाळांसह शहरातील इतरही शाळांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेणाऱ्या शिक्षण विभागाचे यावेळी महापौर नंदा जिचकार यांनी अभिनंदन केले. स्पर्धेमध्ये यावर्षी मनपाच्या १९ व इतर ८२ अशा एकूण १०१ शाळांनी सहभाग घेतला. पुढील वर्षी यावर्षी पेक्षा अधिक शाळांना या स्पर्धेमध्ये सहभागी करू, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली. स्वातंत्र्यदिनाला वंदे मातरम् सर्वत्र गायले जाते, मात्र यामधील फक्त एकच कडवा गायला जातो. इतिहासात काही आक्षेप आल्याने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी एकच कडवे गायनास मान्यता दिली होती. तेव्हापासून ती सुरू आहे. मात्र नागपूर महानरपालिकेने पुढाकार घेत १९९६ ला तत्कालिन महापौर कुंदाताई विजयकर यांच्या नेतृत्वात संपूर्ण वंदे मातरम् समूहगान स्पर्धेचे आयोजन सुरू करून देशात नवा उपक्रम सुरू केला असल्याचे ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांनी यावेळी सांगितले. देशभक्तीच्या अनेक ऐतिहासिक घटनांवर प्रकाश टाकित त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## जीपीओ परिसरातील बांधकाम काढा!

### नागपूर हेरिटेज संवर्धन समितीचे निर्देश : १६ ऑगस्टपासून कस्तुरचंद पार्क सौंदर्यीकरणाचे काम




जीपीओ परिसरात संबंधित प्रशासनाने केलेले तात्पुरते बांधकाम तातडीने पाडण्याचे निर्देश नागपूर हेरिटेज संवर्धन समितीने मंगळवारी (ता. १४) नागपूर महानगर पालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीतील नगर रचना विभागात झालेल्या बैठकीत दिले.सदर बैठकीला नागपूर महानगरपालिकेचे अतिरिक्त उपायुक्त तथा समिती सदस्य राजेश मोहिते, समिती सदस्य वास्तुविशारद अशोक मोखा, समिती सदस्या तथा एलएडी महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती उज्वला चक्रदेव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील इतिहास विभागाच्या प्र–पाठक डॉ. शुभा जोहरी, नगर रचना सहायक संचालक (नागपूर शाखा) सुप्रिया थूल, सहायक संचालक, मनपा (नगर रचना) प्रमोद गावंडे, क्यूरेटर डॉ. विराग सोनटक्के, नगर रचनाकार प्रवीण सोनारे उपस्थित होते. नागपुरातील सिव्हील लाईन्स परिसरातील जनरल पोस्ट ऑफिसची इमारत शासनान्य सूचीनुसार ग्रेड एक चे स्थळ आहे. या इमारतीला लागून संबंधित प्रशासनाने हेरिटेज संवर्धन समितीच्या परवानगीविना बांधकाम केले. ही बाब लक्षात आल्यानंतर हेरिटेज संवर्धन समितीने ३० जानेवारी आणि २२ मे रोजी पोस्ट ऑफिस अधीक्षक यांना पत्र पाठवून माहिती सादर करण्यासाठी निर्देशित केले. पोस्ट ऑफिस अधीक्षकांकडून आलेल्या पत्रानुसार विभागातील कार्यालयीन कामाकरिता जागेची आवश्यकता असल्यामुळे विद्यमान इमारत परिसरात विद्यमान इमारतीला बाधा न पोहचविता तात्पुरते शेडचे बांधकाम केल्याचे नमूद केले आहे. सोबत बांधकामाचे इस्टिमेट, नकाशे इत्यादी सादर करून बांधकामास मान्यता देण्याची विनंती केली आहे. यासोबत जीपीओ इमारत आणि सुरक्षा भिंत रंगरंगोटी करिता हेरिटेज संवर्धन समितीची मान्यता मिळावी, अशी विनंती केली होती. मात्र, पोस्ट विभागाने केलेल्या युक्तीवादावर हेरिटेज समितीने आक्षेप घेत केलेले तात्पुरते बांधकाम तातडीने पाडण्याचे निर्देश दिले. जो पर्यंत हे बांधकाम पाडणार नाही तोपर्यंत रंगरंगोटीचा विषय समिती विचारात घेणार नाही, असा निर्णय दिला. १६ ऑगस्टपासून होणार कस्तुरचंद पार्क सौंदर्यीकरण कामाला प्रारंभ कस्तुरचंद पार्क येथील वार्किंग, जॉगींग, सायकल ट्रॅक, वृक्षारोप आदीचे बांधकाम प्रस्तावित आहे. यासंदर्भात हेरिटेस संवर्धन समितीकडे वेळोवेळी आलेल्या संपूर्ण विषयांना मंजुरी मिळाली असून १६ ऑगस्टपासून तेथील बांधकामाला सुरुवात होणार असल्याची माहिती समितीचे सदस्य अशोक मोखा यांनी समितीला दिली. कस्तुरचंद पार्क येथे उभारण्यात येणाऱ्या सर्वात उंच तिरंग्याचे कामही सुरु झाले आहे. ध्वजस्तंभाचे कार्य पूर्ण झाले असून सौंदर्यीकरणाचे कार्य प्रगतीपथावर असल्याचीही माहिती त्यांनी दिली. सिव्हील लाईन्स नागपूर येथील जुन्या उच्च न्यायालयाची इमारत राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यात आली. यासंदर्भात अधीक्षक आर्कियोलॉजिस्, ऑर्कियोलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, नागपूर सर्कल यांनी विभागीय आयुक्तांना दिलेले पत्र समितीसमोर पृष्ठांकित करण्यात आले, याबाबत समिती सदस्य तथा सहायक संचालक (नगर रचना) प्रमोद गावंडे यांनी सांगितले.

## कार्यकारी अभियंता जांभुळकरसह २४ कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्ती सत्कार

नागपूर महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता (स्लम) डी.डी. जांभुळकर यांच्यासह २४ अधिकारी–कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्तीबद्दल महापालिका प्रशासनाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहात सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नागपूर महानगरपालिकेत विविध विभागात कार्यरत २४ अधिकारी–कर्मचारी आज (ता. ३१) सेवानिवृत्त झाले. त्यांचा शाल, श्रीफळ, तुळशीचे रोपटे, स्मृतिचिन्ह व धनादेश देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, उपायुक्त रवींद्र देवतळे, उपायुक्त राजेश मोहिते, सहायक आयुक्त (सामान्य प्रशासन) महेश धामेचा, प्रमुख अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, निगम अधीक्षक मदन सुभेदार, यावेळी उपस्थित होते. सेवानिवृत्त अधिकारी कार्यकारी अभियंता डी.डी. जांभुळकर यांचा अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे यांनी सत्कार केला. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये कार्यकारी अभियंता स्थापत्य चंद्रशेखर धकाते, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक आर. एम. राठोड, मुख्याध्यापिका कीर्ति वरकडे, सहायक शिक्षिका स्वयंप्रभा खातरकर, शालिनी न्थोनी, अरुणा नगरारे, मेहनाज बेगम, ज्येष्ठ श्रेणी लिपिक माधुरी भालेराव, स्वच्छता निरीक्षक आर.जी. घोरमाडे, लिडींग फायरमन एच.आर. तळवेकर, कनिष्ठ लिपिक आर. ए. पाचघरे, गार्ड यादव वानखेडे, चपराशी सुरेश ठाकरे, दिलीप परिहार, खलाशी सूर्यभान सहारे, मजदूर पुंडलिक अवचट, हरिश्चंद्र नरड, चपराशी नर्मदा भेंडे, सफाई कामगार विजय मेश्राम, शोभा चिघोरे, तिजिया बक्सरिया सदाशीव वाहाणे यांचा समावेश होता. सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी बोलताना अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे म्हणाले, आयुष्यभर केलेल्या सेवेची ही पावती आहे. मनपाच्या सेवेतून आज आपण निवृत्त होत असलो तरी कर्तव्यातून मात्र निवृत्त होता येत नाही. आपण आयुष्यभर नोकरीच्या माध्यमातून केलेल्या सेवेचा आम्ही आदर करतो. अशीच सेवा यापुढेही सुरू राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. सत्काराला उत्तर देताना कार्यकारी अभियंता डी. डी. जांभुळकर यांनी मनपाप्रति कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले, नागपूर महानगरपालिकेला मी नेहमी आपले पालक समजले. प्रामाणिक काम करण्याची सवय महापालिकेनेच लावली. आपल्या कामातून वरिष्ठांचा विश्वास संपादन करू शकलो. येथील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपल्याला खूप प्रेम दिले. त्याबद्दल ऋणी असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यांनी केले.आभार डोमाजी भडंग यांनी मानले. यावेळी सहायक अधीक्षक मनोज कर्णिक, सहायक अधीक्षक दत्तात्रय डहाके, दिलीप देवगडे, दिलीप तांदळे यांच्यासह बहुसंख्य अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.






## नागपुरात शाश्वत शहरी गतीशीलतेवर दोन दिवसीय कार्यशाळा




नागपूर महानगरपालिका, एजेन्स फ्रान्स डी डेव्हलपमेंट (एएफडी) व युरोपियन युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नागपुरातील ’शाश्वत शहरी गतीशीलतेला प्रोत्साहन’ (प्रमोटींग सस्टेनेबल अर्बन मोबिलीटी इन नागपूर) या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेचे मंगळवारी (ता. २८) महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. उद्घाटनपर भाषणात महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, नागपूर शहर स्मार्ट शहरांच्या यादीत आल्यापासून शहरतील विकास कामांना गती मिळाली आहे. शिवाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा पुढाकार व एजेन्स फ्रान्स डी डेव्हलपमेंट आणि युरोपियन युनियन सारख्या संघटनांनी मदतीचा हात दिल्याने नवनवीन प्रकल्प शहराच्या लौकीकात भर पाडण्यास सज्ञ आहेत, असे त्या म्हणाल्या. आयुक्त वीरेंद्र सिंह म्हणाले, शहरात विविध विकास काम, प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. ‘मोबिलाईज युवर सिटी’ उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नागपूर शहराची निवड करण्यात आली. या उपक्रमांतर्गत एजेन्स फ्रान्स डी डेव्हलपमेंट व युरोपियन युनियनतर्फे नागपूर महानगरपालिकेला शहराच्या विकासासाठी तांत्रिक सहकार्य मिळणार आहे. त्यामुळे वेळ, पैसा आणि तंत्रज्ञानाची गुंतवणूक करण्यासाठी हीच योग्य वेळ आहे. महा मेट्रोमुळे वाहतुकीची समस्या सुटणार आहे. मात्र सार्वजनिक वाहतुक साधनांचा वापर करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती होणेही तेवढेच महत्वाचे आहे. लोकांची मानसिकता बदलल्याशिवाय कोणत्याही विकासाला मूर्तरूप येत नाही, असेही आयुक्त श्री. वीरेंद्र सिंह यावेळी म्हणाले. कार्यशाळेचे प्रास्ताविक एजेन्स फ्रान्स डी डेव्हलपमेंटचे लिड ट्रान्सपोर्ट स्पेशॅलिस्ट अर्नाड डॉफीन व भारताच्या युरोपियन युनियन प्रतिनिधी वरिष्ठ प्रकल्प व्यवस्थापक स्मिता सिंग यांनी केले. एएफडी व युरोपियन युनियनच्या सहकार्याने नागपूर शहराच्या विकासात मोठे परिवर्तन होईल, असा विश्वास भारताच्या युरोपियन युनियन प्रतिनिधी वरिष्ठ प्रकल्प व्यवस्थापक स्मिता सिंग यांनी यावेळी व्यक्त केला.